# सुनील सोनी, तिजनबाईने गाजविला दुसरा दिवस

## छत्तीसगडी लोककला महोत्सवाला नागरिकांची गर्दी : मनपाचे आयोजन

**नागपूर, ता. १६ :** छत्तीसगडी लोककलावंत सुनील सोनी आणि डॉ. तिजनबाई पंडवानी यांच्या ओजस्वी वाणीतून झालेल्या प्रबोधनानाने छत्तीसगडी बांधवांचे चांगले मनोरंजन केले.

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने डिपटी सिग्नल मंडई मैदानावर तीन दिवसीय छत्तीसगडी लोककला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचा दुसरा दिवस छत्तीसगडी लोककलावंतांनी गाजविला. छत्तीसगडचे सुप्रसिद्ध गायक कलावंत सुनील सोनी, डॉ. राजकुमार पटेल लोकमंगल, गरिमा-स्वर्णा दिवाकर, डॉ. तिजनबाई पंडवानी, सीमा कौशिक यांनी कार्यक्रम सादर करीत रसिकांची वाहवा मिळवली. छत्तीसगडी लोककलांची ओळख आणि सादरीकरण त्यांनी आपल्या कलेतून केले.

कार्यक्रमाचे संयोजक स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे यांनी आमदार कृष्णा खोपडे यांचे स्वागत केले. सर्व कलावंतांचा सत्कारही त्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी लकडगंज झोन सभापती राजकुमार सेलोकर, नगरसेविका चेतना टांक, सरिता कावरे, नगरसेवक अनिल गेंडरे यांच्यासह मनोज अग्रवाल, महेंद्र कटारिया, शुभम पाटील, शंकर गौर, ईश्वर कावरे, अज़हर अली, शैलेश नैताम, कमलेश शाहू, भारत सारवा, लोकेश बावनकर, अजित कौशल, प्रतीक वैद्य, वेकल शाहू, मोहन गुरूपंच, दयाशंकर गिलोर, विष्णू बानपेला, गयाराम खलगोने, सीताराम मालघाटी, सदाराम सारवा, विष्णू वर्मा, अरुण हनगौत, संजू वर्मा आदी गणमान्य व्यक्ती उपस्थित होते. सोमवारी १७ फेब्रुवारी रोजी महोत्सवाचा अखेरचा दिवस आहे.